॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१२ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने दिला जाणारा राज्य पातळीवरील प्रतिष्ठेचा 'कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कार' यावर्षी महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेला दिला जाणार असून त्यासाठी ९ ऑगस्ट २०२४ पर्यंत विद्यापीठाने प्रस्ताव मागविले आहे.

गेल्या दोन वर्षांपासून विद्यापीठाच्या वतीने राज्यपातळीवर कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कार दिला जातो. रूपये ५१ हजार, स्मृतीचिन्ह आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. सामाजिक, कृषी, शिक्षण आणि साहित्य हे चार क्षेत्र पुरस्कारासाठी निश्चित करण्यात आले आहेत. पैकी यावर्षीचा राज्यस्तरीय पुरस्कार शिक्षण क्षेत्रासाठी दिला जाणार आहे. शिक्षण क्षेत्रात समर्पित भावनेने काम करणारी व्यक्ती अथवा संस्था ज्यांनी मूल्याधिष्ठीत शिक्षणसाठी प्रयत्न केले आहेत.तसेच नाविन्यपूर्ण शिक्षणप्रणाली विकसित केली आहे त्यांनी या पुरस्कारासाठी अर्ज करावेत. दि. ९ ऑगस्ट २०२४ पर्यंत कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कारासाठी अर्ज असे लिफाफ्यावर नमूद करून 'कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, पत्रपेटी क्र. ८०, जळगाव, जिल्हा जळगाव – ४२५ ००१ या पत्त्यावर प्रस्ताव पाठवावेत. पुरस्कारासाठी व्यक्ती किंवा संस्था महाराष्ट्राच्या कोणत्याही भागातील असावी. व्यक्ती असेल तर त्या व्यक्तीचे वय ४० वर्षापेक्षा कमी नसावे आणि १५ वर्षापेक्षा जास्त काळ त्या क्षेत्रात काम केलेले असावे. संस्था असेल तर नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. त्या संस्थेचे कार्य देखील १५ वर्षापेक्षा अधिक असावे. राज्यपातळीवरील या पुरस्कारासाठीची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर देण्यात आली त्यामध्ये विहीत नमुन्यातील अर्ज, पात्रता, नियमावली देण्यात आली आहे. तज्ज्ञ निवड समिती कडून प्राप्त प्रस्तावांची छाननी होऊन पुरस्कार जाहीर केले जातील. विशेष परिस्थितीत पुरस्कारासाठी प्राप्त प्रस्तावा व्यतिरिक्त इतर योग्य व्यक्ती अथवा संस्थेचा देखील विचार केला जाऊ शकतो. शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्ती अथवा संस्थांनी या पुरस्कारासाठी मुदतीच्या आत प्रस्ताव पाठवावेत असे आवाहन कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी केले आहे.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.१२ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे ऑनलाईन पोर्टलचे उद्घाटन कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, ॲड अमोल पाटील, नितीन झाल्टे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील हे उपस्थित होते. यावेळी बोलतांना कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी ऑनलाईन काम ही काळाची गरज गरज असून कमी कालावधीत विद्यार्थी विकासाच्या योजना पोहचविण्यासाठी या प्रणालीचा उपयोग होईल असा विश्वास व्यक्त केला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या एज्युटेक फाऊंडेशनच्या वतीने हे पोर्टल तयार करण्यात आले आहे. या विद्यापीठाचे प्रा. नितीन पाटील, दीपक हर्डीकर यावेळी उपस्थित होते.

उद्घाटनानंतर विद्यार्थी विकास अधिकाऱ्यांची कार्यशाळा घेण्यात आली. तीनही जिल्ह्यातील १७९ अधिकारी व प्राचार्य उपस्थिती होते. विद्यार्थी विकास संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी प्रास्ताविक करून आभार मानले. राजेश बघे, मच्छिंद्र पाटील, जगदीश शिवदे , अनुराग महाजन, चंदन मोरे व कृष्णा लांडगे यांनी या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

......................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १२ जुलै, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी